| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | १९.१०.२०२२ |
| नोंदणी तारीख | १९.१०.२०२२ |
| निकाल तारीख | ०२.०८.२०२४ |
| कालावधी | ०१ वर्षे ०९ महिने १४ दिवस |

भाग अ*

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[**फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र**.** ४४ **(**१**)]**

| | |
|---|---|
| | निशाणी **-** १२/ब |
| अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**,** अहेरी**,** यांच्या न्यायालयात**,**<br>पिठासिन अधिकारी **:** एस**.**एम**.**एच**.**शाहिद**,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. <u>२६४/२०२२</u>, पोलीस स्टेशन अधिकारी, अहेरी, |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२**.**०८**.**२०२४ |
| प्रकरण क्रमांक | संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ४५१/२०२२ |
| | **CNR –MHGA070009512022** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत/द्वारा फिर्यादी सहा. फौजदार देविदास मार्कंडी मानकर |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री**.** सुधाकर पारधी**,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | सतुबाई नारायण नामनवार<br>वय ५१ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार - मद्दीगुडम, तालुका अहेरी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्रीमती स्वाती एस**.** जैनवार<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

भाग ब*****

**[**फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र**.** ४४ **(**२**)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ३१.०५.२०२२ |
| पहिल्या खबरीची तारीख | ३१.०५.२०२२ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १९.१०.२०२२ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | १९.१०.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | २३.१०.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०२.०८.२०२४ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२.०८.२०२४ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | - |

आरोपीबाबत तपशील

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सतुबाई नारायण नामनवार | -- | १९ ऑक्टोबर २०२२ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९च्या कलम ६५(ई) प्रमाणे दंडनिय | निर्दोष | - | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | फौजदारी संहिता |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | दारुबंदी अधिनियम |

भाग क

**[**फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र**.** ४४ **(**३**)]**

अभियोग पक्ष**/**बचाव पक्ष**/**न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी

अ**.** अभियोग पक्ष**:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | नागेश सांबय्या पुट्टावार (निशाणी १२) | पंच साक्षीदार |

अभियोग पक्ष**/**बचाव पक्ष**/**न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी

अ**.** अभियोग पक्ष**:**

| अ**.**क्र**.** | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी पी**-**१३/स.सा.क्र.०१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २. | निशाणी पी**-**१४/स.सा.क्र.०१ | जप्ती पंचनाम्यावरील सही |

ड**.** महत्त्वाच्या वस्तु**:**

| अ**.**क्र**.** | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | -- | -- |

## न्यायनिर्णय

(दिनांकः ०२ ऑगष्ट २०२४)

१. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा आला नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.३१.०५.२०२२ रोजी दुपारी ०२:०० ते ०२.४५ वाजताच्या सुमारास मौजा मद्दीगुडम येथे आरोपीच्या घरात त्याच्या ताब्यामध्ये अवैधरित्या व विना परवाना प्लॅस्टीक कॅनमध्ये २७ लिटर हातभट्टी गुळामोहाची दारु विक्री करण्याकरिता मिळुन आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ करिताः

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यांकरिता अभियोगपक्षाने केवळ एक साक्षीदार तपासला. सा.क्र.१ नागेश सांबय्या पुट्टावार (पंच साक्षीदार) असुन त्यांची साक्ष नि.क्र.१२ अन्वये नोंदविण्यात आली.

३. सा.क्र.१ नागेश सांबय्या पुट्टावार यांनी पुराव्यात असे कथन केले की, दि.३१.०५.२०२२ रोजी पोलीसांनी त्याला पंच म्हणुन कुठेही बोलावले नव्हते. दिनांक ३१.०५.२०२२ रोजीच्या घटनास्थळ पंचनामा व जप्तीपंचनाम्यावर सदर साक्षीदाराची सही असल्याचे त्याने सांगितले. परंतु त्यातील मजकुराबाबत त्याने अनभिज्ञता दर्शवली. सदर साक्षीदारास अभियोग पक्षाने फितुर घोषित करून त्याचा उलटतपास घेतला. परंतु, उलटतपासात सदर साक्षदाराने सर्व सुचक प्रश्नांची उत्तरे नाकारली.

४. दोन्ही पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात तपासलेला साक्षीदार हा पंच साक्षीदार असुन सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन केलेले दिसुन येत नाही. महत्वाचे म्हणजे सदर प्रकरणातील फिर्यादी किंवा तपासी अधिकारी यांना अभियोग पक्षाने तपासलेले दिसुन येत नाही. सदर प्रकरणात अभियोगपक्षाने इतर स्वतंत्र साक्षीदार तपासणे गरजेचे होते. परंतु अभियोगपक्ष त्यांची साक्ष घेण्यास असमर्थ ठरला. सदर प्रकरणात जप्त केलेले द्रव्य दारु असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक

पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला नाही. परंतु, **मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ नागपूर यांनी** **क्रिमिनल रिवीजन अप्लीकेशन क्र.५०/२०१८ दिपक भुराळे वि. महाराष्ट्र शासन** यांचे पारीत केलेले आदेश दि.१३.०३.२०१८ नुसार, "जर आरोपीचे घरातुन अवैधरित्या साठा मिळुन आला तर ते घर आरोपीचे होते हे सिध्द करणे गरजेचे आहे." परंतु सदर प्रकरणात घर आरोपीचे मालकीचे होते याबाबत कोणतेही दस्तऐवज दाखल केले नाही. सबब, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी ही सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र. १ ला नकारार्थी उत्तर देतो.

**मुद्दा क्र. २ करिताः**

६. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यास निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. अभिलेखाचे अवलोकन केले असता, तपासी अंमलदाराने प्लॅस्टीक कॅनमध्ये २७ लिटर हातभट्टी गुळामोहाची दारु जप्त करुन सदर मुद्देमाल नाशवंत असल्याने मोक्यावरच नाश केल्याचे अभिलेखावर नमूद आहे. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य नाही. म्हणून, मुद्दा क्र. २ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

आदेश

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

SAJIDUZZAMAN SHAHID
Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2024.08.02 19:05:45 +0530

दि.०२.०८.२०२४

(एस.एम.एच.शाहिद)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

Name of the stenographer :- J.A. Gadekar, Grade -III.

Name of the Court :- C.J.J.D. & J.M.F.C. Aheri,